# धडा पाठ 6

## सहलीची तयारी

उमा : उद्या सहलीला जाऊया का?
उमेश : वा! छान कल्पना आहे. पण कुठे?
उमा : लोणावळा-खंडाळा
उमेश : वा! फारच उत्तम! मुसळधार पाऊस आहे. खूप भिजूया.
मंजू : सध्या तो घाट हिरवागार आहे. सगळीकडे धबधबेच धबधबे आहेत.
उमेश : एखाद्या डेरेदार झाडाखाली बसूया. डबे खाऊया.
मंजू : पावसात? नको बाबा!
उमेश : खरंच की! तिथं पुलाखाली छान जागा आहे. एका बाजूला विशाल डोंगर आणि दुसऱ्या बाजूला खोल दरी!
उमा : तिथंच एक देऊळही आहे ना?
उमेश : हो हो, बरोबर!
मंजू : कुणाचं?
उमा : शिवाचं, तिथं एक गणपतीची सुंदर मूर्ती आहे.
मंजू : पण तिथं भरपूर जागा आहे का?
उमा : हो, आहे की।
मंजू : पाण्याची सोय आहे का?
उमा : मोठं कुंड आहे. त्यात मासे आहेत. शिवाय नळही आहे.
मंजू : कोणाकोणाला बोलावूया?
उमेश : नितीन, शेखर आणि राजीवला.
मंजू : निशा, उषा आणि विजयाला पण.

## सैर की तैयारी

उमा : कल हम सैर को चलें क्या?
उमेश : वाह! सुझाव तो बढ़िया है। लेकिन कहाँ?
उमा : लोनावळा-खंडाळा
उमेश : वाह! बहुत ही बढ़िया। मूसलाधार वर्षा है।
मंजू : आजकल तो वह घाटी खूब हरीभरी है। सब ओर जलप्रपात ही जलप्रपात हैं।
उमेश : किसी घने वृक्ष के नीचे बैठें और खाना खाएं।
मंजू : बारिश में? ना बाबा।
उमेश : यह तो सच है। वहाँ पुल के नीचे बढ़िया जगह है। एक तरफ विशाल पहाड़ी और दूसरी तरफ गहरी खाई है।
उमा : वहीं एक मंदिर भी है?
उमेश : हाँ-हाँ, बिल्कुल।
मंजू : किसका?
उमा : शिवजी का, वहाँ गणेशजी की सुंदर मूर्ति भी है।
मंजू : लेकिन वहाँ काफी जगह है क्या?
उमा : हाँ। है।
मंजू : पानी की सुविधा है क्या?
उमा : बड़ा कुंड है। उस में मछलियाँ हैं। इसके अलावा नल भी है।
मंजू : किसे किसे बुलाएँ?
उमेश : नितिन, शेखर और राजीव को।
मंजू : निशा, उषा और विजया को भी।
उमेश : मंजू, तू सबसे कहना "ढेर सारी

उमेश : मंजू, तू सगळ्यांना सांग. "खूप खाद्य-पदार्थ आणा."

उमा : नको, जास्त पदार्थ नकोत. फार ओझं घ्यायला नको.

उमेश : उमा, माझा कॅमेरा कुठं आहे?

उमा : कुठला? तो भारतीय बनावटीचा?

उमेश : नाही. तो फार किमती आणि चांगला कॅमेरा आहे. तो पिकनिकसाठी नको. साधाच कॅमेरा घ्यायला पाहिजे.

उमा : ठीक आहे.

मंजू : कुणाकडे टेपरेकॉर्डर आहे का? टेपरेकॉर्डर हवाच.

उमा : हो. विजयाजवळ आहे.

मंजू : तिच्याजवळ चांगल्या कॅसेट्स आहेत ना?

उमा : हो. आहेत ना। त्याची काळजी नको. आणि हो, कुसुमाग्रजांच्या आणि करंदीकरांच्या कवितांची पुस्तकंही घ्यायला हवीत ना?

उमेश : वा! ती तर घ्यायला पाहिजेतच. झाडाची दाट सावली! थंडगार वाऱ्याच्या झुळका, लता-आशाची जुनी मराठी-हिंदी गाणी, आणि कुसुमाग्रज- करंदीकरांच्या कवितांचं वाचन. वा! वा!

उमा : महाराज! हा पावसाळा आहे. उन्हाळा नाही.

उमेश : ठीक आहे. जुनं-पडकं शिवालय, समोर नितळ पाण्याचं कुंड, मुसळधार पाऊस, आजूबाजूला हिरवीगार झाडी, जुन्या चित्रपटांचं मधुर संगीत या सर्वांचाच आपल्याला आनंद घ्यायला हवा. मजाच मजा!

खानेकी चीजें लाना"।

उमा : नहीं, बहुत पदार्थ नहीं चाहिए। ज्यादा बोझ नहीं चाहिए।

उमेश : उमा, मेरा कैमरा कहाँ है?

उमा : कौनसा? वह भारत निर्मित?

उमेश : नहीं, वह बहुत कीमती और बढ़िया कैमरा है। वह पिकनिक के लिए नहीं चाहिए। साधारण सा कैमरा ही लेना चाहिए।

उमा : ठीक है।

मंजू : किसीके पास टेप-रिकॉर्डर है क्या? टेप रिकार्डर अवश्य ही चाहिए।

उमा : हाँ। विजया के पास है।

मंजू : उसके पास अच्छे कैसेट्स हैं न?

उमा : हाँ है ना। उस की चिंता मत करो और हाँ, कुसुमाग्रज और करंदीकर की कविताओं की पुस्तकें भी लेनी चाहिए न?

उमेश : वाह! वह तो लेनी ही चाहिए। पेड़की घनी छाँव, ठंडी हवाओं के झोंके, लता-आशा के पुराने मराठी-हिंदी गाने और कुसुमाग्रज-करंदीकरजी की कविताओं का वाचन, वाह!

उमा : महाराज! यह बारिश का मौसम है। गरमी का नहीं!

उमेश : ठीक है। पुराना जीर्णशीर्ण शिवालय, सामने निर्मल जल से भरा कुंड, मूसलाधार बारिश, आसपास गहरी हरी भरी झाडियाँ, पुरानी फिल्मों का मधुर संगीत! इन सबका हमें आनंद लेना चाहिए। मजा ही मजा!

**शब्दार्थ**

| | |
|---|---|
| उद्या | कल |
| सहल | सैर, पिकनिक |
| उत्तम | बहुत अच्छा, उत्तम |
| मुसळधार पाऊस | मूसलाधार वर्षा |
| भिजणे | भीगना, गीला होना |
| सध्या | हाल ही में |
| घाट | घाटी |
| सगळीकडे | सब तरफ |
| धबधबे | जलप्रपात |
| डेरेदार | घना |
| पाऊस | बारिश, वर्षा |
| पुलाखाली | पुलिया के नीचे |
| जागा | जगह |
| एका बाजूला | एक तरफ |
| डोंगर | पहाड़ |
| खोल दरी | गहरी खाई |
| देऊळ | मंदिर |
| शिवाचे | शिवजी का |
| गणपतीची | गणेशजी की |
| मूर्ती | मूर्ति |
| भरपूर | काफी |
| सोय | इंतजाम |
| कुंड | कुंड, जलाशय |
| शिवाय | अलावा, के सिवाय |
| खाद्यपदार्थ | खाने-पीने की चीजें |
| ओझं | बोझ |
| किमती | कीमती |
| साधा | सादा |
| काळजी | चिंता |
| दाट | घनी |
| सावली | छाँव |
| थंडगार | बहुत ठंडी |
| वारा | हवा |
| झुळका | झोंके |
| पावसाळा | बारिश का मौसम |

| | |
|---|---|
| उन्हाळा | गरमी का मौसम |
| जुनं-पडकं | जीर्ण-शीर्ण |
| नितळ पाणी | निर्मल पानी |
| आजूबाजूला | आसपास |
| हिरवीगार | हरीभरी |
| झाडी | झाडियाँ |
| मधुर | मधुर, मीठा |

## अभ्यास

I नीचे दिए गए प्रश्नों के उत्तर दीजिए।

1) छान जागा कुठे आहे?
2) देऊळात पाण्याच्या सोयीसाठी काय काय आहे?
3) जास्त पदार्थ का नकोत?
4) कुंडाचं पाणी कसं आहे?
5) टेपरेकॉर्डर कुणाकडे आहे?

II उदाहरण के अनुसार कोष्ठक में दिए गए शब्दों के उपयुक्त रूपों का प्रयोग कर वाक्य पूरे कीजिए।

1. *उदाहरण:* त्या .......... खाली एक देऊळ आहे. (डोंगर)
त्या डोंगराखाली एक देऊळ आहे.
1) त्या .......... खाली छान जागा आहे. (पुल)
2) त्या .......... हिरवीगार झाडी आहे. (घाट)
3) त्या .......... करुण दृश्य आहे. (चित्रपट)
4) तो त्या .......... कर्मचारी आहे. (विभाग)

2. *उदाहरण:* आपण .......... जाऊ या. (सहल)
आपण सहलीला जाऊ या.
1) तू .......... वडे कर. (डाळ)
2) ती त्या .......... फुलं आहेत. (बाग)
3) ती .......... झाडाची पानं आहेत. (चिंच)

3. *उदाहरण:* त्या .......... दाट झाडी आहे. (दरी)
त्या दरीमध्ये दाट झाडी आहे.
1) हे थंडगार .......... झाड आहे. (सावली)
2) ते पुस्तक त्या .......... आहे. (खोली)
3) ती फुले त्या .......... ठेव. (परडी)

4. *उदाहरण:* तू त्या मधुर .......... कल्पना कर. (संगीत)
तू त्या मधुर संगीताची कल्पना कर.

1) त्या .......... पाणी थंडगार आहे. (कुंड)
2) त्या .......... एक सुंदर बाग आहे. (देऊळ)
3) महाराष्ट्र .......... राजभाषा मराठी आहे. (राज्य)
4) वाऱ्यामुळे .......... सळसळ होते. (पान)

III उदाहरण के अनुसार नीचे दिए गए जोड़ी वाक्यों के दूसरे वाक्य पूरे कीजिए।

1. *उदाहरण:* ते डेरेदार .......... आहे — ती डेरेदार झाडे आहेत.
   1) त्या ठिकाणी एक सुंदर धबधबा आहे — त्या ठिकाणी अनेक ....... आहेत.
   2) तो बघ मोठा मासा! — ते बघ मोठे .......... .
   3) माझ्याजवळ एक कॅमेरा आहे. — माझ्याजवळ दोन .......... आहेत.
   4) ते पुस्तक इकडे आण. — ती .......... इकडे आणा.
   5) ते वडाचं झाड आहे. — ती वडाची .......... आहेत.
   6) ते देऊळ बघ. — ती .......... बघ.
2. *उदाहरण:* ती <u>खोली</u> स्वच्छ कर. — त्या खोल्या स्वच्छ कर.
   1) कर्मचाऱ्यांची एकच मागणी आहे. — कर्मचाऱ्यांच्या अनेक ...... आहेत.
   2) ती परडी इकडे आण. — त्या .......... इकडे आण.
   3) थंडगार झाडाची सावली! — थंडगार झाडांच्या .......... !
3. *उदाहरण:* तू तो <u>चित्रपट</u> पाहा. — तू ते चित्रपट पाहा.
   1) तो नवीन पदार्थ आहे. — ते नवीन .......... आहेत.
   2) हा माझा मित्र आहे. — हे माझे .......... आहेत.
   3) 'खो-खो' हा भारतीय खेळ आहे. — कबड्डी व खो खो हे भारतीय .......... आहेत.

IV उदाहरण के अनुसार दिए गए वाक्यों में शब्दों के विलोम शब्दों का प्रयोग कर दूसरे वाक्य पूरे कीजिए।

*उदाहरण:* ही बाहुली <u>नवी</u> आहे. — ही बाहुली जुनी आहे.
1) सुचेता उंच मुलगी आहे. — सुचेता .......... मुलगी आहे.
2) ते एक डेरेदार झाड आहे. — ते एक .......... झाड आहे.
3) ती मिरची स्वस्त आहे. — ती मिरची .......... आहे.
4) रामू, तू आज उशिरा ये. — रामू तू आज .......... ये.

V सही जोड़ियाँ बनाइए।

| | |
|---|---|
| | झुळुक |
| | सावली |
| तो | शिवालय |
| | झाडी |
| | संगीत |
| ती | गाणी |
| | घाट |
| ते | दरी |
| | टेपरेकॉर्डर |
| | पाणी |
| | फूल |
| | पूल |
| | देऊळ |
| | नळ |
| | बाग |
| | धबधबा |

VI नीचे दिए गए खंडों में से एक-एक शब्द चुनकर जितने हो सकें उतने वाक्य बनाइए।

| | | |
|---|---|---|
| धबधबा | वस्तू | तिला दे. |
| वाऱ्याच्या | महिना | कोणता? |
| पावसाळ्यातील | पदार्थ | मी उभा आहे. |
| माशांचे | पुस्तक | थंड आहेत. |
| फुलांचे | सुळसुळाट | कर |
| पसाऱ्यातील | खाली | पाऊस |
| नाऱ्यांचा | मुसळधार | इकडे आण |
| उन्हाळ्याचा | झुळुका | बघ |
| डब्यातल्या | अनेक रंग | आहे |

VII कोष्ठक में दिए गए शब्दों का प्रयोग कर वाक्यों का विस्तार कीजिए।

ही बाग आहे. (एक)

.......... .......... .......... (मोठी)

.......... .......... .......... .......... (समोरची)

.......... .......... .......... .......... .......... (सुंदर)

.......... .......... .......... .......... .......... .......... (खूप)

.......... .......... .......... .......... .......... .......... .......... (फुलांची)

......... ........ ......... .......... .......... .......... .......... .......... (रंगीबेरंगी)

VIII उपयुक्त प्रश्न वाचक शब्दों का प्रयोग कर वाक्य पूरे कीजिए।

| | | |
|---|---|---|
| 1) | खंडाळा पुण्याजवळ आहे. | खंडाळा .......... आहे? |
| 2) | खंडाळा सहलीचं ठिकाण आहे. | खंडाळा .......... आहे? |
| 3) | सहलीला उमालाही बोलव. | सहलीला .......... बोलावू? |
| 4) | सहलीसाठी प्रिया, उषा, प्रमोदला बोलव. | सहलीला .......... बोलावू? |
| 5) | बागेत गुलाब, मोगरा, जाई, जुई, अशी तऱ्हेतऱ्हेची झाडं आहेत. | बागेत .......... झाडं आहेत? |
| 6) | बागेत गुलाबाची झाडं आहेत. | बागेत .......... झाडं आहेत? |
| 7) | उमेश अलाहाबादचा आहे. | उमेश .......... आहे? |
| 8) | बाबांचं मूळ गाव कोल्हापूर. | बाबांचं मूळ गाव .......... ? |
| 9) | शांताची बाहुली छान आहे. | शांताची बाहुली .......... आहे? |
| 10) | सुचेताला बाबांची सही हवी. | सुचेताला .......... हवं? |
| 11) | माझ्याकडे तो अहवाल नाही. | तुमच्याकडे .......... नाही? |
| 12) | आम्हाला चहा दे. | तुम्हाला ......... देऊ? |
| 13) | ही परडी प्रियाची आहे. | ही परडी .......... आहे? |

IX कोष्ठक में दिए गए शब्दों में से उपयुक्त शब्द चुनकर अनुच्छेद पूरा कीजिए। (तोडूया, आणूया, तोडू, नकोस, घालूया का? कुठे, बागेतून, जवळच, मागे, तिथून, आण, घाल, काय करू? पाणी, जा, कुठून)

आपण .......... फुलं .......... . मीना तू फुलं .......... .......... . तू फक्त पानं गोळा कर. आपण झाडांना पाणी .......... ..........? पाणी .......... आणूया? इथे .......... एक कुंड आहे. तिथून .......... . .......... आहे कुंड? या देवळाच्या ......... . तुम्ही .......... झारी आणा. पण मी .......... ..........? तू ही .......... . पाणी .......... . झाडांना .......... घाल. पाणी घालूया आणि फुलं .......... .

पढिए और समझिए

## सिंहगड

पुण्याच्या आसपास खूप टेकाडं, टेकडया आणि डोंगर आहेत. पर्वती, हनुमान टेकडी, वेताळ टेकडी एक ना दोन! पण गड मात्र एकच आहे, "सिंहगड". हा नावाचाच सिंह आहे. इथे सिंह नाहीत. याचं मूळ नाव 'कोंडाणा'. हा कुठल्या काळातला आहे माहिती आहे का? हा आहे शिवाजीच्या काळातला. या गडाशी निगडीत एक प्रसिद्ध गोष्ट आहे. "गड आला पण सिंह गेला."

तानाजी म्हणजे शिवाजी महाराजांचा उजवा हात. याची समाधी इथे आहे. हाच त्या गोष्टीतला सिंह! इथे थोडा वेळ न बोलता उभे राहुया.

या गडाच्या चोहीकडे हिरव्यागार दऱ्या आहेत. पण या गडावर विशेष झाडी नाही. हा अगदी उघडाबोडका आहे. वर नुसतंच मोकळं मैदान आहे. सभोवती उंच कडे आहेत.

इथे पाण्याची काही कुंडही आहेत. सर्वात मोठं कुंड आहे 'देवटाकं'. देवटाक्यातलं पाणी सर्वात गोड आणि थंड आहे. याशिवाय या गडावर काहीही नाही. तरीही हा गड मराठी लोकांचा, विशेषतः पुणेकरांचा, प्राण आहे. प्रत्येकाने सिंहगड एकदा तरी पाहायलाच पाहिजे.

शब्दार्थ

| | |
|---|---|
| खूप | खूब |
| टेकाड | टीला |
| टेकडी | पहाड़ी |
| डोंगर | पहाड़, पर्वत |
| गड | गढ़ |
| सिंह | शेर |
| निगडीत | जुड़ी हुई |
| प्रसिद्ध | प्रसिद्ध |
| उजवा हात | दाहिना हाथ |
| समाधी | समाधि |
| चोहीकडे | चारों तरफ |
| नुसतं | केवल, सिर्फ |
| मोकळं मैदान | खुला मैदान |
| सभोवती | आसपास |
| उंच कडे | ऊँची चट्टानें |
| एका बाजूला | एक तरफ |
| गोड | मीठा |
| याशिवाय | इसके अलावा |
| प्राण | जान, प्राण |

## टिप्पणियाँ

I कुसुमाग्रज (जन्म 27-02-1912, पुणे. मृत्यू 10-03-1999, नाशिक)
इनका पूरा नाम विष्णु वामन शिरवाडकर, उपनाम 'कुसुमाग्रज' है। इन्हें 'ज्ञान पीठ पुरस्कार' से भी सम्मानित किया जा चुका है। 'विशाखा' इनका प्रसिद्ध काव्य संग्रह है। 'जीवनलहरी' 'किनारा' 'समिधा' आदि उनके प्रसिद्ध काव्यसंग्रह हैं। 'नटसम्राट', 'दुसरा पेशवा', 'कौंतेय' इनके प्रसिद्ध नाटक हैं। शेक्सपीयर के 'किंग लियर' पर

आधारित इनके नाटक 'नटसम्राट' की बड़ी चर्चा हुई है। कविता में नाटकीयता तथा नाटक में काव्यात्मकता इनकी अपनी विशेषता है। कुसुमाग्रज की कविताओं में बड़ी तेजस्विता है। वे 1964 में मडगाव में हुए अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन के अध्यक्ष रह चुके है।

II विंदा करंदीकर (जन्म 1918)

गोविंद विनायक करंदीकर का कवि नाम विंदा करंदीकर है। 'स्वेदगंगा', 'मृदगंध', 'ध्रुपद' इनके प्रसिद्ध काव्य संग्रह हैं। 'ॲरिस्टॉलचे काव्यशास्त्र' और 'परंपरा आणि नवता' उनकी प्रसिद्ध समीक्षा कृतियाँ है। 'स्पर्शाची पालवी' और 'आकाशाचा अर्थ' ये उनकी अन्य कृतियाँ हैं।

चिंतनशीलता और गेयता उनकी कविता की विशेषता है। उन्हें अनेक सम्मान प्राप्त हो चुके हैं। उन्हें म.प्र. सरकार का 'कबीर सम्मान' और कुसुमाग्रज प्रतिष्ठान का 'जनस्थान पुरस्कार' भी मिला है।

III "गड आला पण सिंह गेला."

छत्रपति शिवाजी महाराज कोंड़ाना को जीतना चाहते थे। उन्होंने यह कार्य अपने विश्वस्त सेनानी तानाजी को सौंपा। उस समय तानाजी अपने लड़के की शादी की तैयारी कर रहे थे। वे शादी छोड़कर सिंहगढ़ के लिए रवाना हो गए। उन्होंने बड़ी चतुराई से किले पर आक्रमण किया और किला जीत लिया। इस अभियान में उन्हें अपने प्राणों की आहुति देनी पड़ी। इस पर शिवाजी महाराज ने उनकी प्रशंसा करते हुए कहा - "गढ़ आया लेकिन सिंह चला गया। ("गड आला पण सिंह गेला.") उसके बाद उन्होंने 'कोंड़ाना' का नाम सेनानी तानाजी की याद में 'सिंहगढ़' रख दिया।

## अभ्यास

I नीचे दिए गए प्रश्नों के उत्तर दीजिए।

1) पुण्याजवळील काही टेकड्यांची नावे सांगा.
2) पुण्याजवळच्या एकमात्र गडाचे नाव काय?
3) हा गड कुणाच्या काळातला आहे?
4) सिंहगडावर काय काय आहे?
5) सिंहगडावरील सर्वात मोठ्या पाण्याच्या कुंडाला काय नाव आहे?

II प्रत्येक शब्द समूह में से कोष्ठक में दिए गए शब्द से संबंधित शब्दों को पहचानिए।

1) फूल, डोंगर, दरी, जागा, कॅसेट, धबधबा - (घाट)
2) पदार्थ, निळा, खेळ, कॅमेरा, पाणी, मजा - (सहल)
3) झाड, सावली, लालभडक, स्वच्छ, मोठी, पाणी - (जागा)

III नीचे दिए गए शब्दों के लिए इस पाठ में आए विशेषण शब्द कोष्ठक में दिए गए हैं। उन्हें उपयुक्त शब्द के साथ जोड़कर वाक्यांश बनाइए।
[मधुर, खोल, मुसळधार, विशाल, लालभडक, पडकं, जुना, नितळ]
पाऊस, संगीत, डोंगर, दरी, देऊळ, साडी, पाणी, चित्रपट.

IV नीचे दिए गए दो शब्द समूहों में से संबंधित शब्दों को चुनकर जोड़ी बनाइए।
1) रेडिओ, सहल, झुळुक, कुंड, सावली, टेपरेकॉर्डर.
2) वारा, पाणी, झाड, कॅसेट, तयारी, गाणी.

V कोष्ठक में दिए गए हिंदी शब्दों के समानार्थी मराठी शब्द का प्रयोग कर वाक्य पूरे कीजिए।
1) आज .......... पाऊस पडतो आहे. (मूसलाधार)
2) तिथे ..........छान जागा आहे. (पुल के नीचे)
3) टेकडीवर .......... आहे. (मंदिर)
4) एका बाजूला विशाल .......... आहेत. (पहाड)
5) खूप .......... होईल. (बोझ)
6) थंडगार वाऱ्यांच्या .......... छान आहेत. (झोंके)
7) समोरच .......... पाण्याचं कुंड आहे. (निर्मल)
8) पाण्याची .......... आहे ना? (सुविधा)

VI हिंदी में अनुवाद कीजिए

सातपुडा पर्वतावर मनुदेवीचे मंदिर आहे. हे एक प्रसिद्ध प्रेक्षणीय स्थळ आहे. पर्वतावर घनदाट जंगल आहे इथे आदिवासी-पावरा लोकांची वस्ती आहे. मनुदेवीचं देऊळ खूप उंच डोंगरांमध्ये आहे. येथे एक मोठा आणि अनेक लहान लहान धबधबे आहेत. हा प्रवास रमणीय आहे आणि प्रवासाचा अनुभव आनंददायक आहे.

VII मराठी में अनुवाद कीजिए

लोनावला और खंडाला दो पहाड़ी स्थान हैं। ये पुणे और मुंबई के बीच में स्थित हैं। यहाँ उँचे-उँचे पहाड़ हैं। खूब घने जंगल हैं। जीर्णशीर्ण मंदिर और कुंड हैं। सुंदर बगीचे हैं। यहाँ बड़े बड़े होटल हैं। सैर के लिए यह बहुत अच्छी जगह है। गर्मी के मौसम के लिए भी यह जगह बहुत अच्छी है।

VIII नीचे दिए शब्दों का प्रयोग कर वाक्य बनाइए।
कॅमरा, देऊळ, धबधबा, हिरवीगार, झुळुका

IX 'किसी दर्शनीय स्थल की सैर' विषय पर एक छोटा अनुच्छेद मराठी में लिखिए।